# जिल्हा वार्षीक योजनेअंतर्गत अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या (आदिवासी क्षेत्र व आदिवासी क्षेत्राबाहेरील) 02 दुधाळ जनारांचा गट वाटप करणे

जिल्हा वार्षीक योजना (अनुसूचित जाती) अनुसूचित जातीच्या लाभार्थींना 2 दुधाळ जनावरांचे गट वाटप योजनेअंतर्गत 2 दुधाळ जनावरांचे गट वाटप केले जातात.

सदरील योजनेसाठी एका गायीची रु.70000/- याप्रमाणे 2 संकरीत गायीसाठी शासन अनुदान 75 टक्के प्रमाणे रु.105000/-व लाभार्थी हिस्सा 25 टक्के प्रमाणे रु.35000/-असे एकुण रु.140000/- योजना प्रस्तावीत असुन तीन वर्षासाठी दोन संकरीत गायीसाठी रु.16850/- विमा काढणे अनिवार्य आहे.तसेच 2-मु-हा/जाफराबादी म्हशीची किंमत जास्तीत जास्त रू.80000/- याप्रमाणे 2 म्हशीच्या गटासाठी 75 टक्के अनुदान रक्कमं रू.134443/-व लाभार्थी हिस्सा रु.44815/-असे एकुण रु.160000/- व तीन वर्षासाठी दोन संकरीत गायीसाठी रु.19258/- विमा रक्कमं काढणे अनिवार्य आहे.
अनुसूचित जातीच्या लाभार्थ्याची निवड खालील प्राधान्यंक्रमाणे करण्यात यावी.प्राधान्यक्रम उतरत्यां क्रमाने

1. दारिद्रयरेषेखालील लाभार्थी
2. अत्यल्पं भूधारक शेतकरी(1 हेक्टंर पर्यतचे भूधारक)
3. अल्पं भूधारक शेतकरी (1 ते 2 हेक्टंर पर्यतचे भूधारक)
4. सुशिक्षित बेरोजगार(रोजगार व स्वंयंरोजगार केंद्रात नोंद असलेले)
5. महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्रं 1 ते 4 मधील)